
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2023

# महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार

पठारे प्रितेश दिलीप
महाविद्यालय चंद्रकला किशोरीलाल गोयल कला आणि वाणिज्य महाविद्यालय दापोडी पुणे.




भारताच्या राजकारणात, समाजकारणात व अर्थकारणात अनेक तज्ञ व दिग्गजांनी अमिट असा ठसा उमटवलेला आहे. त्यांच्यापैकीच एक म्हणजे भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी होय. अनेक विचारांचे प्रेरणास्त्रोत असणाऱ्या महात्मा गांधींनी उदारमतवादाच्या जवळची अशी विचारसरणी विकसित केली आहे, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. महात्मा गांधीजींचे अनेक विचार आदर्श विचारप्रणाली मानून बहुसंख्याकांनी शिरोधार्थ मांडली आहे. महात्मा गांधीजींच्या विचारप्रणालीला अनुसरून आचरण करणारे त्यांचे सच्चे अनुयायी फार कमी आहेत, ही एक शोकांतिका म्हणावी लागेल. वास्तविकपणे महात्मा गांधीजींचे विचार भारतीय आणि संपूर्ण मानवी जीवन समृद्ध करणारे आहेत. कारण कोणतेही प्रश्न अथवा समस्या महात्मा गांधींनी मानवतावादी दृष्टिकोनातून सोडविण्याचा प्रयत्न केला. तसेच सखोल चिंतनातून निर्माण झालेले त्यांचे अनेक विचार मानवी समाजासमोर ठेवून नव्या निष्ठा रुजवण्याचे ही कार्य त्यांनी आयुष्यभर केले. खऱ्या अर्थाने भारतभूमी ही त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू असला तरी संपूर्ण मानवी समाज हा त्यांच्या कार्याचा व विचारांचा परिघ होता. भारतीयांना भारतीय प्रश्नाकडे इतक्या व्यापक दृष्टीने पहावयास सर्वप्रथम महात्मा गांधीजींनीच शिकवले. त्याअनुषंगाने महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार आणि त्या विचारांची अलीकडच्या काळातील प्रासंगिकता काय आहे याचा उहपोह या लेखातून करण्याचा प्रयत्न केला आहे.

### १. औद्योगिकीकरण :-

महात्मा गांधीजींचे अर्थकारण हे जसे मानवतावादावर आधारलेले होते; तसेच अर्थकारणही मानवतावादावरच उभारलेले दिसून येते. खऱ्या अर्थाने महात्मा गांधीजींनी अर्थशास्त्राच्या परिभाषेत अर्थशास्त्र कधीही सांगितले नाही. मात्र, त्यांनी त्यांच्या आर्थिक विचारांमध्ये मौलिक भर घातल्याचे लक्षात येते. महात्मा गांधींनी त्यांच्या आर्थिक विचारात आर्थिक विकासापेक्षा उच्च सामाजिक व वैयक्तिक मूल्य, विकेंद्रीत अर्थव्यवस्था, सत्याग्रहाच्या मार्गाने साधन सूचितेवर भर दिला आहे. तसेच स्वावलंबनावर भर देऊन खादी ग्रामोद्योगाद्वारे आर्थिक विकास साध्य करण्यावर देखील त्यांनी भर दिला. महात्मा गांधीजींनी भारताच्या आर्थिक विकासासाठी एक कार्यक्रम आखून दिला होता त्याचे अनेक पैलू असल्याचे आपणास दिसून येईल. योग्य कार्यक्रम आखून देशाची आर्थिक प्रगती होणे आवश्यक आहे असे महात्मा गांधीजींना वाटत होते. वास्तविक पाहता महात्मा गांधीजींनी आखून दिलेले कार्यक्रम खऱ्या अर्थाने फार मोठे नव्हते. मात्र, त्या कार्यक्रमांच्या आधारे जनआंदोलन निर्माण केले. व्यक्ती समाज आणि राष्ट्र यांची नवनिर्मिती करण्याचे सामर्थ्य आपल्याला महात्मा गांधी यांच्या आर्थिक विचारात सापडते. त्याचप्रमाणे त्यांनी विकेंद्रीत व विश्वासमुलक अर्थव्यवस्थेचा देखील पुरस्कार केला. धनिकांच्या विश्वस्त पणाचा अभिनव सिद्धांत त्यांनी समाजात रूढ केला.

**२. यंत्राला विरोध व श्रमप्रधान व्यवस्थेचे समर्थन :-**

वास्तविक पाहता, महात्मा गांधीजींना पाश्चिमात्य देशाप्रमाणे भारतात औद्योगिकीकरण मान्य नव्हते. औद्योगिकीकरणामुळे बाजारपेठांचा आणि आर्थिक स्पर्धेचा प्रश्न उद्भवतो. औद्योगिकीकरणामुळे खेडी ओस पडून त्यांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष हटकून शोषण सुरु होते. औद्योगिकीकरणामुळे यंत्रांचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळे माणसांना बेकारीच्या खाईत लोटणारी मोठी यंत्रे आणि कारखानदारी यांना महात्मा गांधीजींचा विरोध होता. वास्तविक पाहता महात्मा गांधीजींचा यंत्राला विरोध नव्हता; तर यंत्रामुळे बेकारी निर्माण होते म्हणून मोठी यंत्रे वापरण्यास त्यांचा विरोध होता. शिवण यंत्रासारखी लहान यंत्रे त्यांना जास्त उपयुक्त वाटत होती. लहान लहान यंत्रे मानवाची श्रम करण्याची संधी हिरावून घेत नाही; तर ती माणसाला सहाय्यभूत असतात. व्यक्तीचा भौतिक व आध्यात्मिक असा दोन्ही विकास होण्यासाठी श्रमप्रधान अर्थव्यवस्थेचे महात्मा गांधीजींनी समर्थन केले होते. त्यांचा श्रमप्रधान अर्थव्यवस्थेवर विश्वास होता. महात्मा गांधीजींच्या मते, मानवी श्रमांनी जी कामे करता येत नाहीत अशा सार्वजनिक उपयोगाच्या कामासाठी यंत्रे वापरणे अटळ आहे. ती सर्व यंत्रे सरकारी मालकीची राहतील व लोकहितासाठीच ती वापरली जातील. थोडक्यात, उपयुक्त श्रमांचे अकारण उच्चाटन करणाऱ्या यंत्राचा विचार महात्मा गांधीजींना मान्य नव्हता.

**उदाहरणार्थ, --** छापखाने, शस्त्रक्रियेची उपकरणे इत्यादी परंतु अत्यावश्यक मोठ्या यंत्रांचा वापर त्यांना मान्य होता. पण यंत्रामुळे बेकारी निर्माण होऊ नये असे प्रांजळ मत महात्मा गांधीजींचे होते.

**३. अर्थव्यवस्थेचे विकेंद्रीकरण :-**

पाश्चिमात्य देशांप्रमाणे मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरण मान्य नसणाऱ्या महात्मा गांधीजींना भारतात अर्थव्यवस्थेचे विकेंद्रीकरण व्हावे असे वाटत होते. त्यांच्या मते, " अहिंसक समाजाची उभारणी स्वयंपूर्ण खेड्यांच्या पायावर होऊ शकते, कारखानदारीच्या संस्कृतीवर नव्हे. माझ्या कल्पनेतील ग्रामीण अर्थव्यवस्था कोणतेही शोषण त्याज्य मानते. आपल्याला जे ध्येय साध्य करावयाचे आहे ते मानसिक व नैतिक विकासासह मानवाला सोख्य लाभावे." येथे महात्मा गांधीजींनी "नैतिक" हे विशेषण "अध्यात्मिक" या अर्थाने वापरले आहे. जर अर्थव्यवस्था विकेंद्रीत असेल तरच कोणतेही आर्थिक ध्येय साध्य होईल. कारण त्यांच्या मते, केंद्रित अर्थव्यवस्था समाजाच्या अहिंसक रचनेशी विसंगत आहे. केंद्रित अर्थव्यवस्थेमुळे व्यक्तिगत कौशल्य, वस्तू निर्मितीचे समाधान यांना माणूस मुकत चालला आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी महात्मा गांधीजींना अशा प्रकारची उत्पादन पद्धती आवश्यक वाटत होती की, जी लघु उद्योगांना उत्तेजन देईल, जिथे हस्तव्यवसाय वाढीस लागेल, शोषण - विषमता - गुलामगिरी यांना कोठेही स्थान असणार नाही, साठेबाजीला वाव न राहता वस्तूच्या चढत्या किमतींना आळा बसेल, वस्तूचे उत्पादन व विभाजन परस्परावलंबी असावे, इत्यादी मते महात्मा गांधीजी परखरपणे मांडताना दिसतात.

**४. सहकारी जीवन :-**

महात्मा गांधीजींनी त्यांच्या आर्थिक विषयक विवेचनात "सहकारी जीवन" या तत्त्वाला देखील अनन्यसाधारण असे महत्त्व दिले होते. त्यांच्या मते, सहकारी चळवळीच्या अंगी लोक कल्याण करण्याची फार मोठी शक्ती असते. अशा सहकारी जीवनाचा फायदा शेती क्षेत्राला जास्त होऊ शकतो असेही मत महात्मा गांधीजी व्यक्त करतात. 'हरिजन' या वृत्तपत्रात महात्मा गांधीजी असे म्हणतात की, माझ्या सहकारी जीवनाचा अर्थ असा आहे की - "जमीन धारण करणे, नांगरणे, कसणे या साऱ्या गोष्टी मालकांनी परस्परांच्या सहकार्याने कराव्यात. त्यामुळे मजुरी व भांडवल यांच्यात बचत होईल. जमिनीचे मालक परस्परांच्या सहकार्याने शेतातील कामे करतील. तसेच भांडवल, शेतीची हत्यारे, जनावरे, बी बियाणे इत्यादी सर्व सहकारीतेने खरेदी करतील. माझ्या कल्पनेतील सहकारी जीवन या तत्त्वामुळे जनतेचे दारिद्र्य व गरीबी हद्दपार होईल". सहकारी जीवन या तत्त्वाचा योग्य वापर केल्यास, एक नैतिक जनआंदोलन म्हणून सहकार चळवळ चालवली तर ती भारतासाठी वरदान ठरेल असे महात्मा गांधीजींना वाटत होते.

**५. विश्वस्त वृत्ती :-**

महात्मा गांधीजींना अहिंसक मार्गाने आर्थिक समता प्रस्थापित करावयाची होती. त्यांचा राष्ट्रीय उत्पन्न व खाजगी उद्योगधंदे या दोन्हींवरही विश्वास होता. जर केवळ सरकारने स्वतः सर्व उत्पादन केले तर लोक नैतिक व बौद्धिकदृष्ट्या आपली जबाबदारी विसरतील. म्हणून भांडवलदार व जमीनदार यांनी विश्वस्त वृत्तीने कारखाने सुरू करावेत असे मत महात्मा गांधी व्यक्त

करतात. कार्ल मार्क्सचा वर्ग संघर्षाचा सिद्धांत महात्मा गांधीजींना मान्य नव्हता. भांडवलदार व कामगार, जमीनदार व शेतमजूर, मालक व नोकर असा भेदभाव न करता दोन्ही वर्गांनी एकमेकांना सहकार्य व सहाय्य करावे असे महात्मा गांधीजींना वाटत होते. भारतीय समाजाला जर शांततेच्या मार्गाने खरी प्रगती करावयाची असेल तर धनिक वर्गाला याची जाणीव असली पाहिजे. भारतातील धनिकांनी स्वतःला रयतेचे विश्वस्त मानावे. त्यांनी रयतेच्या लोककल्याणासाठी आपली संपत्ती वापरावी, अशा रीतीने धनिकांनी रयतेसाठी विश्वस्त बनावे. जो विश्वस्त बनतो; तो मालक राहत नाही. केवळ आपल्याकडील संपत्तीचा रक्षक या नात्याने त्याने गुजारा केला पाहिजे हा देखील विश्वस्त वृत्तीचा मार्ग आहे. वास्तविक पाहता महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांमध्ये विश्वस्त वृत्तीला अनन्यसाधारण असे महत्त्व असल्याचे मुख्य कारण म्हणजे -- विश्वस्त वृत्ती ही आर्थिक समता व अहिंसक स्वातंत्र्याची गुरुकिल्ली असून आर्थिक समता साध्य करण्याचे ते एक साधन आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. त्यांच्या मते, विश्वस्त वृत्तीमुळे आर्थिक समता निर्माण तर होईलच, शिवाय या वृत्तीमुळे भांडवलदार व कामगार यातील संघर्ष नाहीसा होईल. समाजात आर्थिक कारणांवरून होणारे संघर्ष नष्ट होऊन एक शांततापूर्ण क्रांती घडून येईल व तिच्यात कोणत्याही प्रकारची कटूता असणार नाही. हे सर्व विश्वस्त वृत्तीमुळे साध्य होण्यास नक्कीच मदत होईल.

### ६. खुशीचे दारिद्र्य :-

माणसांनी वस्तूचा संग्रह करू नये, आपल्या गरजाही कमी कराव्यात यासाठी महात्मा गांधीजींनी खुशीचे दारिद्र्य पत्करल्यावर भर दिला होता. लोकांनी खुशीच्या दारिद्र्यावर भर दिल्यास, कोणालाही लुटण्याचा किंवा कोणाचेही आर्थिक शोषण करण्याचा प्रसंग समाजात ओढवणार नाही. माणसाने कोणत्याही वस्तूचा संग्रह न करता दररोज आपल्या गरजेप्रमाणे मिळवावे, यालाच "खुशीचे दारिद्र्य" म्हणता येईल. इ. स. १९३९ साली झालेल्या गोलमेज परिषदेत 'ऐच्छिक दारिद्र्य' या विषयावर व्याख्यान देताना महात्मा गांधीजी म्हणाले होते की, "परिग्रह हा मला गुन्हा वाटतो. ज्या वस्तू दुसऱ्या लोकांना पाहिजे असतील त्या जेव्हा मिळतील, तेव्हाच त्या वस्तू मी संग्रही करून ठेवू शकेल. पण असे घडून येणे अशक्य आहे. म्हणूनच काहीही जवळ न बाळगणे म्हणजे अपरिग्रह. म्हणजेच स्वच्छने एखाद्या गोष्टीचा त्याग करणे होय".

### ७. सर्वोदय :-

व्यक्तीची सहाय्यता महत्त्वाची मानणारा, आर्थिक व सामाजिक संस्थेवर आधारलेले महात्मा गांधीजींचे "सर्वोदय" हे महत्वाचे तत्त्वज्ञान म्हणावे लागेल. महात्मा गांधीजींच्या मते, सर्वोदय हा समाजातील सर्वांच्या कल्याणाचा विचार करणारी विचारधारा आहे. त्यांना अपेक्षित असणारा नवसमाज, व्यक्ती जीवनाशी निगडित असणाऱ्या राजकीय, आर्थिक, सामाजिक व्यवस्थेबरोबरच शिक्षण, आरोग्य, उद्योग, रोजगार, व्यवसाय इत्यादी विषयांच्या संदर्भात सखोल असेच चिंतन त्यांच्या सर्वोदयात सापडते. महात्मा गांधीजींनी सर्वोदयवादात समाजाचा अध्यात्मिक विकासवाद देखील मांडला आहे. महात्मा गांधीजींना अशा प्रकारचा सर्वोदय हवा होता की, जिथे बहुसंख्यांक यांच्याबरोबरच अल्पसंख्यांक अशा सर्वांनाच विकासाचे संधी मिळून सर्वांचे कल्याण व्हावे या दृष्टीने अर्थव्यवस्था असावी यावर भर दिला.

थोडक्यात, महात्मा गांधीजींचे वरील प्रमाणे आर्थिक विचारांचे पद्धतशीरपणे निरीक्षण केल्यास पुढील प्रमुख लक्षणे त्यांच्या आर्थिक विचारात सापडतात.

१. विकेंद्रीत व विश्वासमुलक अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणे.

२. स्वावलंबनावर भर देऊन खादी ग्रामोद्योगा द्वारा विकेंद्रीत अर्थव्यवस्थेवर भर देणे.

३. समाजात माणसांना बेकार करणारी मोठे यंत्रे वापरण्यास विरोध करणे.

४. श्रमप्रधान व विकेंद्रीत अर्थव्यवस्था स्थापित करणे.

५. व्यक्तिगत कौशल्य प्रगट करता येईल अशा प्रकारची उत्पादन पद्धती असावी.

६. महात्मा गांधीजींना श्रमप्रधान व स्वावलंबी ग्रामव्यवस्था अभिप्रेत होती.

७. आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी सहकारी जीवन, विश्वस्त वृत्ती, खुशीचे दारिद्र्य आणि सर्वोदय इत्यादी संकल्पना महात्मा गांधीजींना महत्त्वपूर्ण वाटतात.

८. पशु जीवन, मानवी जीवन व वनस्पती जीवन यांच्यात योग्य तो तोल राखणे. त्यांचे संबंध परस्परांना पोषक असावे.

९. यंत्रांच्या जीवघेण्या स्पर्धेपासून मानवाचे संरक्षण करणे, जेणेकरून समाजाचे स्वास्थ्य टिकले पाहिजे.

महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांमध्ये एक प्रकारची सखोलता दिसून येते. खऱ्या अर्थाने आधुनिक काळामध्ये आजही आपल्याला जी आर्थिक विषमता, गरिबी, दारिद्र्य यांसारख्या समस्या दिसून येतात. त्या सहमूळ नष्ट करण्यासाठी महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता पटते. महात्मा गांधीजींनी त्यांच्या आर्थिक विचारांमध्ये स्वदेशी, सर्वोदय, विकेंद्रीकरण, विश्वस्तपणा, खुशीचे दारिद्र्य, मानवतावाद यावर आधारलेले अर्थशास्त्र सांगितले आहे. सध्याच्या आधुनिक काळातील यंत्रसंस्कृती, वर्गसंघर्ष, व्यावसायिक व व्यापारी स्पर्धा आणि शेवटी आर्थिक कारणामुळे होणारे युद्ध इत्यादी अनर्थ व परंपरा टाळण्याचा मार्गच त्यांच्या आर्थिक विचारातून आपणास सापडतो. भांडवल ही जर शक्ती असेल तर मानवी श्रम ही पण एक शक्ती आहे, असे सांगून श्रमिक व धनिक दोघांनाही कर्तव्याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न देखील महात्मा गांधीजींनी त्यांच्या आर्थिक विचारातून सांगितला आहे. सर्वोदया सारख्या तत्वज्ञानातून त्यांनी सर्वांच्या कल्याणाचा व उद्धाराचा रस्ता दाखविला आहे. वास्तविक पाहता गांधीजींसाठी "राजकीय संत" , "राजकीय तत्वज्ञ" , "गुढवाद व वास्तववाद यांचा समन्वय साधणारा विचारवंत" , "प्रयोगशील राजकारणी" , "नैतिक क्रांतीवादी" अशी अनेक विशेषणे सार्थ ठरतात. आशीर्वाद यांनी म्हटल्याप्रमाणे - महात्मा गांधीजी प्रामुख्याने धार्मिक वृत्तीचे व मानवतावादी नेते होते, तसेच कृतिशील व ज्ञानी चिंतकही होते. ते गुढवाद आणि वास्तववाद यांचा अद्भुत संगम साधणारे होते. ते धर्मात्माचे सोंग घेऊन वावरणारे राजकारणी नव्हते. तर राजकारणात सामान्य माणसाच्या हितासाठी झटणारे धार्मिक प्रवृत्तीचे मानव होते. अशा या महामानवाने भारतीय राजकारणात अमित असा ठसा उमटून मोलाची कामगिरी केली आहे यात काही शंका नाही.

## संदर्भ ग्रंथ

१. आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, डॉ. सुमित्रा काकडे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे ३७.
२. गांधी विचारांचे दर्शन, दा. न. शिखरे
३. एक सर्जनशील भजन, बी. एन. घोष
४. माझे सत्याचे प्रयोग (आत्मकथा) महात्मा गांधी
५. महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार, प्रा. अजय काटे, प्रा. भाविका पाटील
६. गांधी विचार, दर्शन, धर्मविचार, खंड २, भाऊ धर्माधिकारी.
७. महात्मा गांधीजींचे विचार, ब्रिजमोहन डेहा (अनुवाद), अहमदाबाद.